दैनिक
# अजिंक्य भारत
17 Aug 2025 - Page 2

# मांगीलालजी शर्मा विद्यालयात सायबर सुरक्षा विषयक जागरूकता कार्यशाळा



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १६ :** मांगीलालजी शर्मा विद्यालय, अकोला येथे इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यां साठी सायबर सुरक्षा विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्या त आले. या कार्यशाळेचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. भानुदास यांनावर सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विशेष मार्गदर्शक म्हणून साक्षी दिनेश शिरसाट व प्रणाली विजय दवणे , हे शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला येथील बीसीए अंतिम वर्षाचे विद्यार्थी, उपस्थित होते. क्विक हिल फाउंडेशन यांच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या कॅम्पियनच्या अंतर्गत या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व, इंटरनेटचा सुरक्षित वापर, सायबर गुन्ह्यांपासून बचावाचे उपाय, तसेच वैयक्तिक माहितीचे संरक्षण कसे करावे याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणां द्वारे सायबर जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यशाळेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा विषयक माहिती आत्मसात करत जागरूकतेचा संदेश घेतला.ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला चे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू सर समन्वयक डॉ. दीप्ती पेटकर मॅडम यांच्या सहयोगाने घेण्यात आली.